**कनिष्ठ सहाय्यक गट-क या पदावरून परिचर गट-ड या पदावर पदावनत करणे बाबत.**
(श्री गवळी हनुमान पंडीत, कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग, पंचायत समिती कोपरगाव)

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**सामान्य प्रशासन विभाग**
जिल्हा परिषद आदेश क्रमांक.साप्रवि/आस्था-३/२३६/२०२५
अहिल्यानगर दिनांक ११/०३/२०२५

वाचा:- १. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम २७ (१) (बी)
२. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/५०२३/१५११/२०२३ दिनांक ०४/१२/२०२३
३. श्री गवळी हनुमान पंडीत, कनि सहा, शिक्षण विभाग, पंचायत समती कोपरगाव यांचा विनंती अर्ज दिनांक १२/०२/२०२५
४. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-१/१००/२०२५ दिनांक ०४/०३/२०२५

श्री गवळी हनुमान पंडीत, कनि सहा, शिक्षण विभाग, पंचायत समिती कोपरगाव यांना संदर्भ क्रमांक ०२ च्या आदेशान्वये परिचर गट-ड या संवर्गातुन कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदावर शिक्षण विभाग, पंचायत समिती कोपरगाव येथे पदस्थापना देण्यात आलेली आहे.

तथापी श्री गवळी हनुमान पंडीत, कनि सहा, शिक्षण विभाग, पंचायत समिती कोपरगाव यांनी संदर्भ क्र. ३ च्या विनंती अर्जाव्दारे कौटुंबिक कारणास्तव कनिष्ठ सहाय्यक गट-क या पदावरुन परिचर गट-ड या पदावर पदावनत करणेबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार संदर्भ क्रमांक ०१ मधील तरतुदीनुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर श्री गवळी हनुमान पंडीत, कनि सहा, शिक्षण विभाग, पंचायत समिती कोपरगाव यांना कनिष्ठ सहाय्यक या पदावरून **परिचर गट-ड** या पदावर पदावनत करून त्यांना परिचर गट-ड या पदावर **इमाव** प्रवर्गात सुधारीत वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर **एस-१ (१५०००-४७६००)** या वेतनश्रेणीमध्ये **प्राथमिक आरोग्य केंद्र चासनळी ता कोपरगाव** येथे पदस्थापना देत आहे.

तसेच श्री गवळी हनुमान पंडीत, कनि सहा, यांची परिचर गट-ड या पदावर वेतन निश्चिती करतांना त्यांना कनिष्ठ सहाय्यक गट-क या पदावर पदोन्नती दिली नसती तर त्यांनी जे वेतन घेतले असते त्याप्रमाणे वेतन निश्चिती करण्यात यावी. तसेच यापुढे श्री गवळी हनुमान पंडीत, कनि सहा, शिक्षण विभाग, पंचायत समिती कोपरगाव यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात येऊन त्याची नोंद संबंधिताचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. **20250311040038** असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 19-03-2025 15:43:42
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रति,**
श्री गवळी हनुमान पंडीत, कनि सहा, शिक्षण विभाग, पंचायत समिती कोपरगाव
द्वारा:- गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कोपरगाव

**प्रत:- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव**
१. **गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कोपरगाव**
२. ....................................................................................
२/- उक्त कर्मचारी हजर होताच हजर अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

**प्रत:-** मुळ नस्ती.